**उपक्रमः १**

उपक्रमः वंशावळ (फॅमिली ट्री)

उपक्रमाचे स्वरुपः व्यक्तिगत, वर्गाबाहेर करावयाची कृती

उद्देशः आपल्या स्वतःच्या कुटुंबाची पिढीजात माहिती करून घेण्यासाठी

साहित्यः वही, पेन

वेळः घरी करावयाची कृती

कृतीः विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ/मोठ्या व्यक्तींकडून आपल्या कुटुंबाची माहिती घ्यावी. यामध्ये जितक्या जुन्या पिढ्या असतील तेवढे मागे जाऊन माहिती घ्यावी. जसे- पणजोबा, त्यांचे भाऊ, बहिणी, त्यांची मुले आणि नातू व नातवंडे यांची नावे.

उदा. नमुना



**उपक्रमः १**

उपक्रमः बदलते घर

उपक्रमाचे स्वरुपः व्यक्तिगत, वर्गाबाहेर करावयाची कृती.

उद्देशः बदलते जीवनमान, बदलत्या वस्तू, बदलत्या वापर पध्दती आणि एकंदरीतच जीवनशैलीची माहिती आणि त्याकडे चिकित्सकपणे पाहण्याची समज विकसित करण्यासाठी.

साहित्यः वही, पेन

वेळः घरी करावयाची कृती

कृतीः मुलांनी आपापल्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींना विचारून त्यांच्या काळातील खालील वस्तूंची त्यांच्या वापराविषयीची माहिती करून घेणे. आज बदललेले त्याचे स्वरूप यांची तुलना करणे.

१) चूल/चुलीचे प्रकार
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

२) भिंती/भिंतींचे स्वरूप
- अ) कसे होते
- ब) कसे आहे

३) न्हाणीघर/बाथरूम
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

४) घराचे छप्पर/छत
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

५) दार/कवाड
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

६) खिडक्यांचे प्रकार
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

७) परसबाग
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

८) कोठा/गोठा
- अ) कशी होती
- ब) कशी आहे

**उपक्रमः ३**

उपक्रमः पारंपारिक गाणी सग्रह/गाण्यांचा संग्रह

उपक्रमाचे स्वरुपः व्यक्तिगत किंवा सामुहिक (वर्गाबाहेर करावयाचा उपक्रम)

उद्देशः लेखन शैली आणि छपाई यंत्र यांचा शोध लागण्याच्या आधीपासून लोकांनी आपापल्या भाषेमध्ये अनेक गाणी, बडबडगीते निरनिराळी कामे करत असताना म्हणावयाची गाणी, सण, उत्सव, मृत्यू यासारखे अनेक प्रसंगावरती म्हणावयांच्या गाण्यांची रचना केली. हे गाणे त्या त्या काळातील समाज जीवन, समाजाचे आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक इ.अंगांचे, निसर्गाचे, निसर्गातील निरनिराळ्या बदलांचे वर्णन करणारे होते. आज चित्रपट, रेडिओ, वर्तमानपत्र, टीव्ही चॅनल्स या सर्वांच्या धामधुकीत ही परंपरागत गाणी विसरली जात आहेत. ह्या पारंपारिक गाण्यांचे संकलन करून जतन करणे या बरोबरच त्या गाण्यातून त्या त्या काळातील जीवनशैलीची ओळख मुलांना होणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

साहित्यः वही, पेन, निवांत संध्याकाळची वेळ

वेळः घरी, गावामध्ये, शेतामध्ये निवांत वेळ

कृतीः मुलांनी आपल्या घरातील, गावातील अशी लोक जी निरनिराळ्या प्रसंगात गाणी म्हणतात त्यांच्याकडून प्रत्येकी शक्य तितकी गाणी लिहून घेणे, लिहिल्यानंतर ती त्यांना वाचून दाखवणे आणि शाळेत ती चालीनुसार म्हणण्याचा प्रयत्न करणे.

साधारणतः खालील प्रकारच्या गाण्यांचा संग्रह होऊ शकतो.
१) जात्यावरच्या ओव्या
२) लग्नातली गाणी
३) मोटेवरची गाणी
४) बारशाला म्हटली जाणारी गाणी
५) शेतात काम करताना म्हटली जाणारी गाणी
६) विविध सणाला म्हटली जाणारी गाणी
७) डोहाळ जेवणाला म्हटली जाणारी गाणी
८) आपापल्या गावातील पारंपारिक गाणी
९) भारूड

**उपक्रमः ४**

उपक्रमः स्वतःचे गाव/परिसराचा नकाशा बनवा.

उपक्रमाचे स्वरुपः वर्गात करावयाचे उपक्रम

उद्देशः मुलांना आपण राहतो तो परिसर, गाव, गावाती रस्ते, पाण्याचे स्त्रोत, झाडे, मैदाने आदिंची ओळख व्हावी तसेच तालुक्याचे ठिकाण, बाजाराचे ठिकाण, निरनिराळ्या ठिकाणांच्या दिशा आदि बाबत विद्यार्थ्यांचे आकलन वाढवणे.

साहित्यः चार्ट पेपर, रंगीत पेन्सिल, स्केचपेन, खोडरबर, पेन्सिल, शार्पनर.

वेळः ४५ मिनिटे (५ मिनिटे सूचनांसाठी, ३० मिनिटे नकाशा काढण्यासाठी, १० मिनिटे काढलेल्या नकाशावर चर्चेसाठी.)

कृतीः पाच-पाच मुलांचे चार ते पाच गट बनवून त्यांना खालील बाबी दाखवणारा नकाशा काढावयास सांगावे. मुलांनी नकाशा काढल्यानंतर त्यांना आपापसात एकमेकांच्या/गटांच्या नाकाशाची चर्चा, तुलना आणि राहिलेल्या गोष्टी याबद्दल चर्चा करावयास सांगणे. शेवटी भूगोलाच्या पुस्तकातील किंवा बाजारातून संबंधित गावाचे/ठिकाणाचे नकाशे आणून दाखविणे.

नकाशात दर्शविण्यास सांगावयाच्या बाबी-
१) स्वतःची शाळा/इतर शाळा
२) ग्रामपंचायत
३) प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना
४) बाग
५) मैदान
६) विहिर, तलाव, हपसा/बोर, हातपंप
७) बस स्थानक, रेल्वे स्थानक
८) पोस्टऑफिस
९) रस्ते
१०) बाजाराचे ठिकाण
११) दिशा
१२) इतर गावच्या/दृष्टिने महत्वपूर्ण गोष्टी.ि